Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 23/07/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या... आपलं महानगर | my महानगर.com www.mymahanagar.com

## दिनविशेष

### स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



बाळ गंगाधर टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रगण्य नेते होते. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच, या गर्जनेने त्यांनी लोकांमध्ये स्वातंत्र्यप्रेम जागवले. ते संपादक, शिक्षक आणि समाजसुधारक होते. त्यांचे धैर्य, देशभक्ती आणि राष्ट्रवादामुळे ते भारतातील लोकप्रिय नेते बनले. त्यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली गावात झाला. त्यांचे जन्मनाव केशव होते. ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे पहिले जहालवादी नेते होते. त्यांचे वडील गंगाधर टिळक हे शाळेत शिक्षक होते. टिळकांनी १८७७ मध्ये पुण्यातील डेक्कन कॉलेजमधून बी.ए. गणित विषयात पदवी मिळवली. त्यानंतर १८७९ मध्ये मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयातून त्यांनी कायद्याची पदवी घेतली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा टिळकांवर खूप प्रभाव होता. त्यांच्या प्रेरणेने टिळकांनी १८८० मध्ये शाळेची स्थापना केली. पुढे जाऊन टिळक आणि त्यांच्या काही निकटवर्तीयांनी १८८४ मध्ये डेक्कन सोसायटीची स्थापना केली.

अगदी सुरुवातीपासूनच टिळक भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग बनले. ब्रिटिश लेखक आणि राजकारणी, 'व्हॅलेंटाईन चिरोल' यांनी त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले होते. ते जहालवादी क्रांतिकारकांना पाठिंबा देण्याच्या बाजूने होते आणि त्यांच्या 'केसरी' या वृत्तपत्रातून त्यांच्या कार्याचे खुलेपणाने कौतुक करायचे. केसरी या वृत्तपत्राद्वारे प्रफुल्ल चाकी आणि खुदीराम बोस यांना पाठिंबा दिल्याबद्दल त्यांना बर्माच्या मंडाले तुरुंगात सहा वर्षांची शिक्षा झाली. चाकी आणि बोस या दोघांवर दोन इंग्रज महिलांच्या हत्येचा आरोप होता. टिळकांनी १९०८-१४ पासून मंडाले तुरुंगात सहा वर्षे घालवली. तिथे त्यांनी 'गीता रहस्य' लिहिले. या पुस्तकाच्या अनेक प्रती विकून जमा झालेला पैसा स्वातंत्र्य चळवळीला मदत करण्यासाठी दान करण्यात आला. लोकमान्य टिळकांचे १ ऑगस्ट १९२० रोजी निधन झाले.

Nashik Edition
Jul 23, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * CENTRAL LIBRARY * YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401